PRESS RELEASE
For favour of Publication

Kirit Somaiya
B.Com., C.A.
MEMBER OF PARLIAMENT
(LOK SABHA)

MUMBAI PARLIAMENTARY OFFICE
Whip : BJP Parliamentary Party
President : Investors' Grievances Forum
President : Yuvak Pratishthan

Neelam Nagar, Mulund (E), Mumbai-81. Tel.: 2564 4151 (6 lines) • Fax : 2590 0699
E-mail : kiritsomaiya@hotmail.com • Website : www.kiritsomaiya.org

10 फेब्रुवारी, 2004

*किरीट सोमैयांनी पत्रकार परिषदेत केलेले निवेदन*

# मतदार यादया – मोठया प्रमाणात मतदार वगळले

किरीट सोमैया

घाटकोपर, चेंबूर व अन्य मध्यमवर्गीय रहिवाशी सोसायटीतील रहिवाश्यांची नांवे मोठया प्रमाणात वगळण्यात आल्याचे सिध्द झाल्याचा दावा किरीट सोमैया यांनी मुंबई येथे केले. गेल्या आठवडयात श्री.सोमैया यांनी दिल्ली येथे मुख्य निवडणुक आयुक्त श्री.कृष्णमुर्ती यांची भेट घेतली होती. घाटकोपर व चेंबूर येथील 10 व 20 टक्के मतदार कमी झाले असल्याचे त्यांच्या नजरेत आणून दिले होते.

निवडणूक विभागाच्या कर्मचा–यांनी घरोघरी जाऊन ज्या मतदार यादया तयार केल्या त्यात यावेळी इमारतीतील मजले किंवा गाळे, परिवार किंवा परिवारातील नांवे वगळली गेली असल्याचे आढळले आहे. घाटकोपरच्या कार्यकर्त्यांनी गेल्या रविवारी घाटकोपर येथील गारोडीया नगर, वल्लभबाग गल्ली या परिसरातील 4 बुथ, मतदार केंद्राची प्रत्यक्ष घरोघरी जाऊन तपासणी केली. बुथ क्र.44 मध्ये सन 1999 मध्ये 791 मतदार होते, त्यापैकी 95 नांवे बेकायदेशीररित्या दाखविली गेली असल्याचे लक्षात आले आहे. विपुल अपार्टमेंट, निलकंठ भवन, निलकंठ ज्योत येथील अनेक परिवारांची नांवे गायब आहेत.

मतदार केंद्र – बुथ क्र.90 वल्लभबाग गल्ली येथील जुन्या मतदारांपैकी 58 नांवे गाळली गेली आहेत. जलाराम नगर मधील रणछोडभाई पटेल परिवार, दिलीप शहा परिवार, कोठारीवाडीतील संजय अंबेडे परिवार, श्रीसदन बिल्डींगमधील महादेव होडबे परिवार, विजय बिल्डींगमधील श्रॉफ, पटेल, कोठारी, मेहता, गांधी हे सगळे परिवार मतदार यादीतून गायब आहेत.

मुख्य निवडणुक आयुक्तांनी सुचना दिल्या नंतरही मुंबईतील मतदार नोंदणी अधिकारी फक्त सारवासारव करीत आहेत. गेल्या आठवडयात चेंबूर व घाटकोपर परिसरात निवडणूक विभागाचे कर्मचारी काही कारणास्तव नुसती ''बनवाबनवी'' करीत असल्याचे सोमैया यांनी सांगितले आहे.

ज्या लोकांची नांवे वगळण्यांत आली आहेत अशी सर्व नांवे निवडणुक विभाग का घोषित करीत नाही? ही नांवे निवडणुक विभागाच्या वेब साईटवर देण्यांत यावी. सगळया मतदान केंद्रावर लावावीत. राजकीय, सामाजिक संघटनाना ती उपलब्ध करुन दयावी, अशी मागणी श्री.सोमैया यांनी केली आहे. प्रामाणिक मतदारास त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवणे ही अत्यंत निषेधार्ह अशी बाब आहे असे श्री.सोमैया यांनी सांगितले आहे.

---